**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक १९ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **बहीण भावाच्या अतूट प्रेमाचे प्रतीक असलेल्या राखी पौर्णिमेच्या सणाचा सर्वत्र उत्साह.**
2. **२१ ऑगस्ट पासून बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ इथं पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं आयोजन.**
3. **मॉरिशस आणि एनसीआय-नागपूर यांच्यात सामंजस्य करार, मॉरिशसच्या कर्करुग्णांवर आता नागपुरात होणार उपचार.**
4. **23 ऑगस्ट पर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी, आज नागपूर आणि अकोल्यात पावसाची हजेरी.**

****

राखी पौर्णिमा

बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा राखी पौर्णिमेचा सण आज साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नागरीकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. धार्मिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून विविधतेत एकतेचं दर्शन घडवणारा हा सण असून, महिलांच्या अधिकारांचं रक्षण करण्याच्या आपल्या प्रतिबद्धतेला बळकटी देणारा देखील हा सण असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं आहे.

उपराष्ट्रपती जगदीप धनकड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशवाशियांना राखी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. शालेय

विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांना राख्या बांधून आज रक्षाबंधन साजरं केलं. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी राज्यभरातून १ कोटी ४० लाख अर्ज आले. त्यातील पात्र झालेल्या १ कोटी ४ लाख लाभार्थ्यांच्या खात्यात योजनेचे पहिल्या दोन हप्त्यांचा निधी जमा करण्यात आल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. महिलांच्या खात्यात जमा झालेले पैसे लाभार्थ्यांशिवाय अन्य कुणालाही काढता येणार नसल्याचही मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, कागदपत्रे आणि तांत्रिक कारणांमुळे ज्यांना निधी मिळाला नाही त्या अडचणी दूर करून त्यांनाही निधी देणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. राज्यभरातून सुमारे एक हजार महिला आज वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री शिंदे यांना ओवाळण्यासाठी आणि राखी बांधण्यासाठी आल्या होत्या. यावेळी मुख्यमंत्री उपस्थित महिलांशी संवाद साधला. जनतेच्या आशिर्वादाने सरकारची ताकद वाढेल. राज्याची आर्थिक ताकद वाढत जाईल तसे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील निधीची रक्कम वाढविण्याचा मानस असल्याचं ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. आज रक्षाबंधनाच्या निमित्तानं मिळालेली ही भेट मोलाची आहे, अशी प्रतिक्रिया नागपूरच्या छाया कडू यांनी दिली आहे. त्या म्हणाल्या की----

***"माझ नावं छाया कडू मी छावणी नागपूर इथे राहते माझे छोटेसे बचत गटाचे काम आहे आणि लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री ची योजना आहे त्याचा मला जे हातभार लागत आहे त्यासाठी मी***

***त्यांचे मनापासून आभार मानत आहे. कारण या योजनेमुळे आम्हाला थोडी फार मदत होणार आहे. माझ्या कारभारात मुलांच्या शिक्षणासाठी थोडीफार मदत भेटणार आहे. त्यांनी आमच्यासाठी ही योजना काढली आमच्यासारख्या गरीब बायांना थोडी मदत होईल ही खूप मोठी गोष्ट आहे आमच्यासाठी."***

निर्मला सीतारामन

अर्थमंत्री निर्मला सीतारामन सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या कामकाजाचा आज आढावा घेत आहेत. नवी दिल्ली इथं होत असलेल्या आढावा बैठकीत बँकांच्या ठेवी, कर्ज-ठेवी गुणोत्तर आणि मालमत्तेच्या गुणवत्तेत झालेली वाढ यांचं मूल्यमापन करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना, पीएम सूर्य घर आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनांचाही या बैठकीत आढावा घेतला जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. नवीन सरकारच्या कार्यकाळातली सीतारामन यांची बँकांबरोबरची ही पहिलीच आढावा बैठक आहे.

कोलकाता अत्याचार -उद्या सुनावणी

कोलकाता इथल्या आरजी-कार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या पार्श्वभूमीवर पद्म पुरस्काराने सन्मानित सत्तरहून अधिक डॉक्टरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या प्रकरणात वैयक्तिकरित्या हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.दरम्यान, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कायदा करण्याची

मागणी करत आजही दिल्ली इथं निवासी डॉक्टरांचा संप सुरु आहे. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं स्वत:हून दखल घेतली असून सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या.जे.बी.पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर उद्या मंगळवारी सुनावणी होणार आहे.

राज्यस्तरीय कृषी महोत्सव

राज्याच्या कृषी विभागातर्फे परवा २१ ऑगस्ट पासून बीड जिल्ह्यात परळी वैद्यनाथ इथं पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काल या महोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला. या कृषी महोत्सवात भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन त्याचबरोबर राज्यभरातल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शक अशा अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते, तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे.

एकनाथ शिंदे

देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते तेंव्हा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे मराठा समाजाला विरोध करतात, हा आरोप पुर्णपणे चुकीचा आहे त्यात कोणतेही तथ्य नाही. आम्ही सर्वजण एकत्रितपणे निर्णय घेतो असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं. मराठा

आरक्षण तसंच सगेसोयऱ्यांच्या मुद्दयावर मुख्यमंत्री शिंदे यांना काम करायचं आहे, मात्र फडणवीस त्यांना काम करू देत नसल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला होता. त्यावर, मराठे समाजाचे सर्व निर्णय माझ्या आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या काळात झाले. आरक्षण विषयात त्यांना मी थांबविल्याचं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले तर राजीनामा देत राजकारणातून निवृत्त होईन, असं आव्हान देवेंद्र फडणवीस यांनी दिलं होतं. याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी वर्षा बंगल्याबाहेर माध्यमांशी बोलताना खुलासा केला. फडणवीस यांच्यावरील आरोप पूर्णपणे चुकीचे आणि तथ्यहीन आहेत. मराठा समाजाला आरक्षण देताना उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार असे आम्ही एकत्र बसलो. प्रत्येक बैठकीत फडणवीस यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत कायदा करण्यात मोलाची भूमिका घेतली, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

सामंजस्य करार

नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट, नागपूर आणि मॉरिशस सरकार यांच्यात आज मुंबई इथं एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली असून, मॉरिशसमधील कॅन्सर उपचारात आता नागपूरचा फार मोठा सहभाग राहणार आहे. मॉरिशसचे केंद्रीय मंत्री ॲलन गानू आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मुंबई इथं या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारानुसार, मॉरिशसमधील कर्करोग रुग्णांना नागपुरातील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युटमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची वैद्यकीय सेवा मिळू शकेल. त्याचप्रमाणे मॉरिशसमधील रुग्णालयांमध्ये कार्यरत

आरोग्य कर्मचारी, नर्सेस इत्यादींना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सुद्धा NCI घेईल. मॉरिशस इथल्या महाराष्ट्र भवनासाठी राज्य सरकारतर्फे जाहीर 8 कोटी रुपयांचा धनादेश प्रदान करण्याच्या सोहोळ्यासाठी मॉरिशसचे केंद्रीय मंत्री ॲलन गानू हे हिवाळी अधिवेशनादरम्यान आले असता त्यांनी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युटला भेट दिली होती.

कृत्रिम बुद्धीमत्ता कुंभमेळा

देशातला पहिला एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता कुंभमेळा नाशिकमध्ये होणार आहे. या अनुषंगानं काल नाशिकमध्ये तंत्रज्ञान आणि परंपरेचा संगम साधणाऱ्या, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पहिल्या बिल्डथॉनचं, उद्धाटन विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांच्या हस्ते झालं. यावेळी राज्य शासनाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी चौधरी यांनी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धीमत्ता साधनांवर आधारित सादरीकरण केलं. कुंभथॉनच्या अधिकृत संकेतस्थळाचं तसंच कुंभ मेळ्यासाठी समर्पित एआय - सक्षम चॅट बॉटचं उद्धाटनही करण्यात आलं.

भारत बंद

सुप्रीम कोर्टाच्या एससी-एसटी आरक्षणाच्या उपवर्गीकरण व क्रिमी लेअरबाबत एक ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय संसदेने तात्काळ रद्द करून घटना दुरुस्ती करावी यासाठी देशातील सामाजिक, कामगार, कर्मचारी, राजकीय संघटनानी 21 ऑगस्ट रोजी भारत बंदची हाक दिली आहे. या बंदला पीपल्स रिपब्लिकन पार्टी जाहिर समर्थन असून आपण आंदोलनात

सहभागी होणार असल्याचं पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी सागितलं आहे.

ब्ल्यू सुपर मून

आज रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी अवकाशात 'ब्ल्यू सुपर मून' ही खगोलशास्त्रीय घटना पाहता येणार आहे. ब्ल्यू सुपर मूनच्या दिवशी चंद्र हा नेहमी पौर्णिमेला उगवणाऱ्या चंद्रापेक्षा अधिक मोठा दिसतो . चंद्र पृथ्वीच्या अधिक जवळ येणार असल्यानं त्याचा प्रकाश नेहमीपेक्षा ३० टक्क्यांहून अधिक प्रखर आणि आकारही १४ टक्क्यांहून अधिक असणार आहे. ही घटना अत्यंत दुर्मिळ समजली जात असल्यानं खगोलप्रेमी आणि अभ्यासकांत मोठी उत्सुकता आहे.

वीज-पाणी पुरवठा

महापारेषण तर्फे परवा २१ ऑगस्ट रोजी नागपूर नजीक मनसर इथं 33 केवी मनपा एक्सप्रेस-फिडरवर देखभाल दुरुस्तीचे कार्य हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी दुपारी 12 ते चार दरम्यान वीज पुरवठा बंद राहणार आहे. पेंच जलाशयातून करण्यात येणारा पाणीपुरवठा यामुळे प्रभावित होणार असून शहरातील लक्ष्मीनगर, धरमपेठ, हनुमान नगर, धंतोली, नेहरूनगर, गांधीबाग, सतरंजीपुरा, आशीनगर आणि, मंगळवारी अश्या ९ झोन मधील भागात पाणीपुरवठा खंडित राहील. अधिक माहितीसाठी मनपा आणि OCWला संपर्क केला जाऊ शकतो.

हवामान

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट हवामान खात्यातर्फे जारी करण्यात आला होता, त्यानुसार आज सकाळी नागपुरात मेघगर्जनेसह जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. त्याचप्रमाणे अकोल्यात देखील पाऊस झाल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. दरम्यान, उद्यापासून 23 तारखेपर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दरम्यान 23 ऑगस्ट रोजी गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. दरम्यान मागील 24 तासांत चंद्रपूर इथं सर्वाधिक 34. 8 इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

महावितरण

महावितरणच्या भरारी पथकांनी एप्रिल ते जुलै 2024 या चार महिन्यांत 3 हजार 459 ग्राहकांची तपासणी करून 1,019 जणांची प्रत्यक्ष वीजचोरी पकडली आहे. यातून 6 कोटी 72 लाख रुपयांची वीज चोरी उघडकीस आली आहे. याशिवाय, 5 कोटी 92 लाख रुपयांची अनियमित वीज वापराची 732 प्रकरणेही उघडकीस आणण्यात भरारी पथकाला यश मिळालं आहे. तर विजचोरीची रक्कम न भरलेल्या ग्राहकांविरुध्द विविध पोलीस ठाण्यात तब्बल 114 विजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा

राज्य शासनाचा मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा यंदा मुंबईत येत्या २१ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या कार्यक्रमात ५८ आणि ५९ वा राज्य मराठी चित्रपट पुरस्कार यंदा एकाच वेळी प्रदान केले जाणार आहेत. त्याचबरोबर २०२३ चा चित्रपती व्ही.शांताराम जीवनगौरव पुरस्कार, राज कपूर जीवनगौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येतील.

*****